सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

साप्ताहिक
# प्रगत भारत
..वर्ष १९ वे
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,,mo.9860877789

LAXMI JEWELLERS
अप्रतिम विश्वासाच अलिशान दालन..
सरकारमान्य सोने-चांदी दागिन्यांची खात्रीशीर जुनी पेढी
लक्ष्मी ज्वेलर्स
रुक्मिणी कॉम्पलेक्स,देहू-आळंदी रोड,टाळगाव चिखली,पुणे मो-९८९०१५४३५४

• वर्ष:१९ • अंक क्र.०५ • साप्ताहिक • मंगळवार दि.२१ ते २७ जुलै २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट-PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००



## डॉ.डी.वाय.पाटील आर्टस कॉमर्स अँड.सायन्स कॉलेज पिंपरी येथे क्विक हिल फौंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा ते सायबर सुरक्षा उपक्रमाचे यशस्वी आयोजन

### पिंपरी-चिंचवड शहर पोलिसदलातील सायबर सेलचे एपीआय प्रवीण स्वामी यांची उपस्थिती व मार्गदर्शन




विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**पिंपरी-डॉ.डी.वाय.पाटील आर्टस कॉमर्स अँड.सायन्स कॉलेज पिंपरी येथील क्विक हिल फौंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा ते सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत कार्यरत सायबर फसवणुकीचे वाढते प्रकार, कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर आणि जबाबदार डिजिटल नागरिक घडविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. .कार्यक्रमाची सुरुवात क्लबच्या अध्यक्षा नेहा मडिवालकर यांनी क्लबचा परिचय करून देत केली. त्यांनी क्लबची उद्दिष्टे, कार्यपद्धती तसेच विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.यानंतर निविदा काळे आणि आकाश वाघवाड यांनी बनावट ऑनलाइन कोर्स आणि**
फेक सर्टिफिकेट फसवणूक या विषयांवर मार्गदर्शन केले. ऑनलाइन शिक्षणाच्या नाव-ाखाली होणाऱ्या फसवणुकीची ओळख कशी करावी,विश्वासार्ह शिक्षण प्लॅटफॉर्मची निवड कशी करावी आणि आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.
कार्यक्रमातवाढत्या सायबर गुन्ह्यांवर आधारित जनजागृतीपर व्हिडिओ प्रदर्शित करण्यात आले.त्यानंतर सार्थक पानसरे यांनी तंत्रज्ञानाचे थेट प्रात्यक्षिक सादर करून कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर करून होणाऱ्या फसवणुकीचे वास्तव उपस्थितांसमोर उलगडून दाखविले.
कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लवकरच प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपट ''भूतम भयम'' च्या कलाकारांची विशेष उपस्थिती. छाया कदम, करण सोनावणे,नील साळेकर, पुष्कराज चिरपूटकर, सौरभ घाडगे,मनमीत पेम,शुभम जाधव,सिद्धांत सरफरे, शोभिता कुडतडकर, प्रियदर्शन जाधव, सुहिता थत्ते आणि प्रताप फड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.
त्यांनी क्विक हिल सायबर वॉरस क्लबच्या कार्याचे कौतुक करत सुरक्षित डिजिटल जीवनशैली स्वीकारण्याचा संदेश दिला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.पी.डी. पाटील,सचिव डॉ.सोमनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांनी सायबर जागरूकता ही काळाची गरज असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा दूत म्हणून समाजात कार्य करावे,असे आवाहन केले.
तसेच क्विक हिल फौंडेशनचे अजय शिर्के, संत तुकाराम नगर पोलीस स्टेशनचे पीएसआय शशिकांत गाडेकर, पिं-परी-चिंचवड सायबर सेलचे एप-ीआय प्रवीण स्वामी,AMDOCSPS चे Director of software Engineering रविंदर पाल सिंह,ANGLOWORKS चे Vice President-Human Resources आशिष बांके,BSCML News Channel चे संपादक यशवंत गायकवाड,अँकर सौ.अनित विरजदार,साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे तसेच दैनिक प्रभातचे पत्रकार जयदीप सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थित होते
उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व,डिजिटल जबाबदारी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुरक्षित वापर आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याची आवश्यकता अधोरेखित केली. सुरक्षित,जागरूक आणि सशक्त डिजिटल समाज घडविण्यासाठी अशा जनजागृती पर उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करत त्यांनी क्विक हिल फौंडेशनचे मनापासून कौतुक केले.
या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व आयोजन मधील सर्व पदाधिकारी,सायबर वॉरियर्स स्वयंसेवक आणि शिक्षक समन्वयक प्रा.सत्यवान कुंजी यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले.